Indian Streams Research Journal
Vol -2 , ISSUE –7, Aug - 2012
ISSN No - 2230-7850 Available online at www.grt.net

ORIGINAL ARTICLE

# सामाजिक क्रांतीचे प्रणेते : महात्मा ज्योतिराव फुले

**प्रा. गोपीचंद या. कठाणे**
स्व. राजेंद्रसिंह उर्फ बाबा व्यास कला वाणिज्यमहाविद्यालय, कोंढाळी,जि. नागपूर

**प्रस्तावना:**

एकोणीसाव्या शतकात जे पुरोगामी विचाराचे आणि सुधारणा वादाचे वारे वाहत होते त्यासाठी विविध संस्था आणि व्यक्ती प्रयत्न करत होत्या. त्यात महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव गौरवाने घ्यावे लागेल. विद्यार्थी दशेत असतानाच त्यांच्या मनात राज्यक्रांतीच्या कल्पना थैमान घालत होत्या. फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांतितील समता आणि बंधुत्व या तत्त्वांनी त्यांचे सुधारणावादी मन अस्वस्थ झाले. तसेच त्यांच्या ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत ब्राह्मणेत्तर असल्याने त्यांचा जो अपमान झाला तो घाव त्यांच्या जिव्हारी बसला. त्यातूनच त्यांचे विद्रोही मन बंड करायला उभे झाले. विषमतेचे विच्छेदन आणि हीनदीनाची उन्नती हे उद्दिष्ट त्यांनी मनाशी बाळगले. यातूनच त्यांच्या स्फोटक विचारांनी ग्रंथनिर्मिती करायला सुरुवात केली. मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी त्यांनी शाळा काढली. कामगारांसाठी रात्रीची शाळा सुरू केली. या काळात त्यांना त्यांच्या ब्राह्मण मित्रांची मदत झाली परंतु विरोधकांचे प्रमाण तुलनेत खूपच होते. लोकविरुद्ध कार्यामुळे वडिलांनी घराबाहेर काढले. मारेकऱ्यांनी प्राण घातक हल्ला केला पण दलित्तोधाराचे व्रत स्वीकारणारे ज्योतिबा थोडेही डगमगले नाही. उच्चवर्णातील बाल विधवांवर येणारा किळसवाना प्रसंग टाळण्यासाठी त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. एवढेच नव्हे तर एका बालविधवेच्या मुलाला त्यांनी स्वतः दत्तक घेतले हा मुलगा म्हणजे त्यांचा यशवंत होय. आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृशांसाठी खुला केला. ज्यांना हिंदू धर्मात वेदाधिकार नव्होता अशा हीनदीन जाती साठी, त्यांच्या उद्धारासाठी दिव्य करणारे ज्योतिबा हे पहिले पराक्रमी सुधारक होय.

शेतकऱ्याच्या कळवलळ्याने त्यांची नाडवणूक करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर, सावकारांवर ते असूड चालवितात.सत्ताधाऱ्यांचे उपरोधिक वर्णन करतात. त्यांना इंग्रजी राज्याच्या रक्त शोषकतेची किती चीड व्होती हे त्यांच्या कार्यावरून दिसून येते . ज्योतिबांनी तत्कालीन परिस्थितीचा विचार धार्मिक, सामाजिक, आर्थिक दृष्टीने केला. ऐतिहासिक किंवा राजकीय दृष्टीने मुळीच केला नाही. त्यांच्या समाज क्रांतीच्या कार्याला स्थिर संघटित स्वरूप प्राप्त करण्यासाठी त्यांनी ' सत्यशोधक समाजाची ' स्थापना केली. हे त्यांचे सामाजिकक्रांतीच्या दृष्टीने टाकलेले पहिली क्रांतिकारी पाऊल होय. फुलांच्या अगोदर किंवा समकाळात समाज सुधारनांचे कार्य सुरू नव्हते असे नाही परंतु ते एका विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित होते. याचबरोबर संस्कृत भाषेतील ज्ञान भांडार दीन- दलितांसाठी खुले नसल्याने त्यांची जी धार्मिक,सांस्कृतिक हानी झाली याचे शल्य फुलांच्या मनात सलत होते. तसेच इंग्रज राजवटीने जरी शिक्षण सर्वांसाठी खुले केले असले तरी त्याचा पुरेपूर फायदा हा पांढरपेशीनाच होत होता. त्यामुळे हंटर कमिशनला सादर केलेल्या निवेदनात त्यांनी सरकारचा कडाडून विरोध केला. प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षण व व्यवसाय शिक्षण या तीन मागण्यावर त्यांनी भर दिला. शिक्षण पद्धती व शिक्षक वर्ग यासंबंधी त्यांच्या सूचना लक्षात घेण्यासारख्या होत्या. कनिष्ठ जातींना शैक्षणिक सवलती देण्याचा त्यांचा आग्रह होता यावरून त्यांचे शैक्षणिक प्रश्न किती मूलगामी होते हे दिसून येते. तत्कालीन इतर सुधारकाप्रमाणे ते नुसते सुधारणावादी नव्हते तर ' बोले तैसा चाले ' या कसोटीतील कर्तुत्वान सुधारक होते.

कनिष्ठ वर्गातील लोकांचना शिक्षणाचा अधिकार नाही हा समज सर्वांग रूढ झाल्याने सर्वांना शिक्षण द्यावे असा विचार उच्चवर्णीयांना कधीच स्पर्श करून गेला नाही. भारतात इंग्रजांचे राज्य येण्यापूर्वी सर्वांना शिक्षण देणे हे सरकारी दायित्व आहे असा समज नव्हेता. पण पुढे ईस्ट इंडिया कंपनीच्या 1813 सालच्या सनदीनुसार भारतात प्रथमच शिक्षण सर्वांसाठी खुले केल्या गेले. नवा समाज घडण्याला व सुधारणावादाला पोषक अशा शिक्षणास प्रारंभ झाला. राजकीय गुलामगिरीपेक्षा सामाजिक गुलामगिरी अधिक वाईट आहे, जातीभेद हा एकोप्याचा आणि सुसंस्कृत जीवनाचा शत्रू आहे.असे ठाम मत फुलांचे होते. कनिष्ठ वर्ग हा विचार संपन्न नसल्याने त्यांनी मानसिक गुलामगिरीत स्वतःला बांधून घेतले. अज्ञान म्हणजे अंधार आणि शिक्षण म्हणजे प्रकाश, शिक्षण हे सर्व सुधारण्याची मूळ आहे कनिष्ठांची सुधारणा करायची असेल तर त्यांचे शिक्षणाचे दरवाजे खुले करून प्रसार केला पाहिजे तरच समतेच्या कल्पनेने स्फुरलेले हे कनिष्ठ वर्गातील लोक सामाजिक समतेसाठी बंड करतील. याच उद्देशाने त्यांनी शिक्षण व समतेचे निशान 1848 साली उभारले. हिंदुस्थानात स्त्री शिक्षणाकडे लक्ष दिल्या जात नाही याचे त्यांना दुःख झाले यावर उपाय म्हणून त्यांनी कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी 1848 साली पुण्याच्या बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात स्त्रियांसाठी शाळा सुरू केली . सहकारी सखाराम परांजपे हे त्यांना शाळा चालविण्यासाठी मदत करी. तथापि पुणे म्हणजे सनातन्यांचे माहेरघर यामुळे त्यांना या कार्यात विलक्षण त्रास सहन करावा लागला. परंतु ज्योतिबांनी मात्र आपले स्त्री उद्धाराचे कार्य सोडले नाही. स्त्रियांच्या हक्कासाठी,उद्धारासाठी त्याग करणाऱ्या, छळ भोगणाऱ्या ज्योतिबांना स्त्रियांचा उद्धार करता म्हणून सन्मानाने गौरविण्यात आले.

ज्योतिबांचे मत असे होते की, कनिष्ठ वर्गातील लोकांना अशा तऱ्हेचे शिक्षण द्यावे की, ते आपल्या समतेच्या आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कासाठी जगण्यास तयार होतील. याच सुमारास ज्योतिबांच्या सहकाऱ्यांनी व्यवस्थित धोरण आणि व्यक्ती काय ? असा प्रश्न निर्माण करून मतभेद निर्माण केले. काही विशिष्ट परिस्थितीत त्यांना त्यांची शाळा एका संस्थेच्या स्वाधीन करावी लागली. ज्योतिबांनी पुराणे, धर्मशास्त्र, इतिहास याची लावलेले अर्थ विचार सूत्राचे केलेले स्पष्टीकरण हे त्यांच्या सहकाऱ्यांना मानवली नाही. कनिष्ठ वर्गांना फक्त लिहिणे वाचणे व गणित शिकवावे असे मत होते तर ज्योतिबांच्या मते चांगली गोष्ट करण्यात आणि वाईट गोष्ट करण्यात ही कारक व अहितकारक त्यांचे चांगले ज्ञान होईल सर्वांना आवश्यक आहे या गोष्टींना सहकाऱ्यांचा विरोध होता. ज्योतिबा आणि त्यांच्या पत्नी विनावेतन निस्वार्थ हेतूने आणि निष्ठेने कार्य करीत होते. शिक्षणाचा पाया हा समाधानकारक पायावर असावा विद्या भावी आयुष्यात उपयुक्त व्यवहार उपयोगी ठरेल कशी असावी. अभ्यासक्रम आणि शिक्षण यात त्यांना अमुलाग्र सुधारणा हवी होती ते त्यांनी करण्याचा प्रयत्न केला.

फुलांच्या परंपरेतील त्याच्यानंतर चे आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे समाज सुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर फुल्यांविषयी व त्यांच्या जीवनकाळाविषयी अत्यंत महत्त्वाचे विचार मांडलेले आहे त्याहीपेक्षा अत्यंत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी महात्मा फुले यांना आपल्या सामाजिक क्रांतीचे गुरु मानले. महात्मा फुले यांचा सुधारणावाद हा डॉक्टर आंबेडकरांच्या कार्याला बऱ्याचशा प्रमाणात उपकार ठरलेला आहे. ज्योतिबांच्या कार्याचा काळ इंग्रजी राजवटीतला होता आगरकर टिळकांप्रमाणे आधी स्वातंत्र्य की सुधारणा आणि तत्कालीन पेच फुलांना पडला नाही कारण फुलांच्या सुधारणेच्या मुळाशी सत्य आणि विवेक हे मूलतत्त्व होते. शूद्रतिशुद्र समाजाचा कळवळा तत्कालीन हिंदू हिनकस बाबी टाकून देण्याचे ब्रीद फुलांनी अंगीकारले होते. फुल्यांनी ज्या धार्मिक सुचविल्या त्याचे समाजाने आचरण करण्याचा आग्रह केला. तळागळातील शेतकरी शेतमजूर दीनदुबळे पुरुष अस्पृश्य समाजाने शिक्षणाची कास धरल्याशिवाय अजिबात तरुण उपाय नाही असा जीवन विषयक मंत्र फुलांनी या मानवी समाजाला दिल्याची दिसून येते

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शैलीचा व मानवतावादाचा प्रभाव त्यांच्या कार्यपद्धतीवर आहे विशेषतः धार्मिक क्षेत्रात सुधारणेच्या संदर्भात किंवा धर्मात मानवतावाद ते शोभतात फुलांचे मानवतावादाचे सामाजिक मूल्यमापन नजरेआड करता येत नाही. फ्रेंच राज्यक्रांतीतून निर्माण झालेल मानवतावादी विश्वबंधुत्व व त्यातूनच स्फुरलेले मन हे फुलांच्या लेखन कृतीतून दिसून येते. एकंदरीत महात्मा ज्योतिराव फुले म्हणजे खऱ्या मानवतेची पुजारी होय असे म्हणावे लागेल.

**संदर्भग्रंथ**

१. महात्मा ज्योतिराव फुले- धनंजय कीर

२. महात्मा ज्योतिराव फुले व्यक्तीने कार्य- राम कांडगे

३. महात्मा ज्योतिबा फुले- पंढरीनाथ पाटील

४. महात्मा फुले गौरव ग्रंथ- पी. वी. साळुंखे

५. भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा- ज्योतिराव फुलेना.ग. पवार

६. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : काळ व कर्तृत्व- मा. गो. माळी

७. महात्मा फुले समग्र वांङमय- धनंजय कीर ,स.गं मालशे

८. गुलामगिरी- महात्मा ज्योतिराव फुले

९. सार्वजनिक सत्य धर्म- महात्मा ज्योतिबा फुले

१०. शेतकऱ्याचा असूड- महात्मा ज्योतिराव फुले